<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची दुसरी यादी</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### चांदोली धरण (ता.शिराळा, जि.सांगली) परिसरात आधुनिक भूकंपमापन यंत्रणा बसविण्याबाबत

**(१) १०३६४ (२३-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली धरण (ता.शिराळा, जि.सांगली) परिसरात भूकंपाचा केंद्रबिंदू असल्यामुळे दररोज भूकंप होत असताना त्याची आगाऊ सूचना देणारी अद्ययावत व आधुनिक भूकंपमापन यंत्रणेची आवश्यकता असतानाही जुनी ३२ वर्षापूर्वीची कालबाह्य यंत्रणा कार्यान्वित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूकंपमापन केंद्राची इमारत जीर्णावस्थेत असून त्याठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षेच्यादृष्टीने या ठिकाणी अत्याधुनिक भूकंपमापन यंत्रणा बसविण्याबाबत तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची मागणी होत असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चांदोली धरण परिसरात आधुनिक भूकंपमापन यंत्रणा बसविण्याबाबत, भूकंपमापन केंद्राची इमारत दुरुस्ती व त्याठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०९-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरची भूकंपमापन यंत्रणा सन १९८५ मध्ये बसविण्यात आली असून कार्यान्वित आहे.

भूकंपाची आगाऊ सूचना मिळणारी आधुनिक यंत्रणा अस्तित्वात नाही. फक्त झालेल्या भूकंपाची नोंद भूकंप मापनयंत्रामध्ये प्राप्त होते.
(२) वारणावती भूकंपमापन इमारत सद्य:स्थितीत दुरूस्ती पूर्ण झाल्याने सुस्थितीत आहे. भूकंपमापन केंद्राचे परिचालन माहितीगार अनुभवी, कार्यरत व आवश्यकतेनुसार करार तत्वावर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमार्फत केले जात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, आधुनिक भूकंपमापन यंत्रणा बसविण्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील गरोदर व स्तनदा माता, बालके व असंसर्गजन्य रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत

**(२) १०४९७ (२३-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय हे कोरोना रुग्णांसाठी आरक्षित केल्याने अन्य रुग्णांना उपचारासाठी मुंबई, गुजरात किंवा खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी जावे लागत असल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय, उपकेंद्रे, आरोग्य पथके यामध्ये ३० ते ५० टक्के पदे रिक्त असून उपलब्ध असलेल्या वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन थकीत असल्याने त्यांना वेतनाअभावी काम करावे लागत असून कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची शहरी भागासह महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रालगतच्या भागांमध्ये नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामीण भागामधील कोरोना काळात बाल स्वास्थ्य योजना तसेच गरोदर व स्तनदा मातांची आवश्यक तपासणी होत नसून माता, बालके व असंसर्गजन्य रुग्ण हे वैद्यकीय सेवांपासून वंचित राहत असून कुपोषित बालकांना वितरित करण्यात येणारा दोन महिन्याचा टीएचआर खाद्य देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी तसेच ग्रामीण भागात गरोदर व स्तनदा माता, बालके व असंसर्गजन्य रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

रिक्त पदे भरण्याकरीता पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे. सद्य:स्थितीत रिक्त पदांच्या ठिकाणी काही संवर्गात कंत्राटी स्वरुपात कर्मचारी/ अधिकारी यांची पदे भरली आहेत. कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकडून रुग्ण सेवा

देण्यात येत आहे. तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अदा करण्यात येत आहे. जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) करोना काळात सर्व शाळा व अंगणवाडी केंद्रे कोविड-१९ कालावधीत करावयाच्या उपाययोजनामधील मार्गदर्शक सूचनांनुसार बंद करण्यात आल्याने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शाळा व अंगणवाडी येथील बालकांची आरोग्य तपासणी ही माहे, ऑगस्ट, २०२१ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात बंद होती, परंतु आरोग्य संबंधित असलेल्या आशा वर्कर यांचेकडून तसेच ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये येथे आणलेल्या व आलेल्या बालके, गरोदर व स्तनदा मातांची नियमित तपासणी करण्यात येत असल्याने कोणतीही गरोदर व स्तनदा माता वैद्यकीय सेवांपासून वंचित राहिलेल्या नाहीत. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कुपोषित बालकांना वितरित करण्यात येणारा पूरक पोषण आहार माहे जुलै-ऑगस्ट, माहे सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्याचा वितरित करण्यात आला असून, माहे नोव्हेंबर-डिसेंबर या महिन्याचा पोषण आहार वाटप सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पाच्या बांधकामात करण्यात आलेल्या अनियमितता झाल्याबाबत

**(३) १०५२१ (२३-११-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ७७२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पाच्या बांधकामात करण्यात आलेल्या अनियमितता व गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी दिनांक २२ मार्च, २०१० रोजी नेमण्यात आलेल्या एक सदस्यीय वडनेरे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विभागीय चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०९-०३-२०२) :** (१) होय, श्री.नंदकुमार वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव या एकसदस्यीय समितीने गोसीखुर्द प्रकल्पासंबंधात सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम-१९७९ मधील नियम-८ व १२ अन्वये दिनांक २३/११/२०१० च्या ज्ञापनान्वये एकूण १४ व दिनांक २८/०३/२०१३ च्या ज्ञापनान्वये ०१ अधिकाऱ्याविरुध्द (नव्याने अंतर्भुत) दोषारोपपत्रे बजावून एकत्रित विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती.
(२) सदरहु विभागीय चौकशीचे काम पूर्ण झाले आहे. विभागीय चौकशीअंती एकूण १२ अधिकाऱ्यांविरुध्दचे दोषारोप सिध्द होतात, या निर्णयाप्रत येवून शासनाने १२ अधिकाऱ्यांना शिक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, ०२ अधिकाऱ्यांवरील दोषारोप सिध्द होत नाही, या निर्णयाप्रत येवून शासनाने त्यांना दोषमुक्त केले आहे. विभागीय चौकशी दरम्यान ०१ अधिकाऱ्याचा मृत्यू झाला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंचर (ता.आंबेगाव, जि.पुणे) उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(४) १०५८६ (२३-११-२०२१) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड, आंबेगाव व जुन्नर (जि.पुणे) या आदिवासीबहुल तालुक्यांसाठी मध्यवर्ती असणाऱ्या मंचर उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरुन २०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यासंदर्भात दिनांक २३ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री तथा मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शासनाने मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उपमुख्यमंत्री महोदयांसह मा.गृह मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री, अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यासमवेत दिनांक २३ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत, मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत तत्वत: मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१०-०३-२०२२) :** (१), (२) व (३) दिनांक २२/०६/२०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीत मंचर, ता.आंबेगाव जिल्हा पुणे येथील उप जिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांवरुन २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. याअनुषंगाने, दिनांक १३/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये, मंचर ता.आंबेगाव, जि.पुणे येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास “विशेष बाब” म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आशा स्वंयसेविकांचे गेल्या ६ महिन्यांचे मानधन थकित असल्याबाबत

**(५) १०५९१ (२३-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात (National Health Mission-एनएचएम) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुमारे ६९ हजार आशा स्वयंसेविका कार्यरत असून त्यांना माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२१ या ६ महिन्यांचे मानधन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशा स्वयंसेविकांना थकीत मानधनाची रक्कम तातडीने देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोग्य संचालक, मुंबई, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे गेल्या २ महिन्यापासून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आशा स्वयंसेविकांना माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२१ या ६ महिन्यांचे मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना माहे एप्रिल, २०२१ ते माहे ऑगस्ट, २०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीतील मानधन रुपये ७६.६५ कोटी व सन २०२०-२१ मधील प्रलंबित रुपये ८.४१ कोटी अशी एकूण रुपये ८५.०६ कोटी रक्कम दिनांक ०९/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०३/१२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये माहे सप्टेंबर, २०२१ ते माहे ऑक्टोबर, २०२१ या २ महिन्याच्या कालवधीची रुपये ३०.६६ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धरणांचे नियंत्रण कार्यालय, नदी-जोड प्रकल्पाचे कार्यालय व राष्ट्रीय विकास जलअधिकरण केंद्राचे कार्यालय नाशिक येथून वैजापूर यांच्या नियंत्रणाखाली आणण्याबाबत

**(६) १०६०९ (०२-१२-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील नांदूर-मधमेश्वरसह भाम, भावली, मुकणे व वाकी या धरणांचे नियंत्रण कार्यालय व कोकणातून सुरु होणाऱ्या नदी-जोड प्रकल्पाचे कार्यालय तसेच, राष्ट्रीय विकास जल अधिकरण केंद्राचे कार्यालय नाशिक येथून वैजापूर (जि.औरंगाबाद) यांच्या नियंत्रणाखाली आणावे यासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालय, पाटबंधारे विभाग यांची आढावा बैठक घेण्यात आली असून सदर आढावा बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नाशिक येथील सदरहू कार्यालये औरंगाबाद येथे आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१६-०३-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. मा.ना.डॉ.भागवत कराड, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील पाण्याचे दुर्भीक्ष दूर करण्यासाठी कोकणातून पाणी वळविण्यासाठीच्या योजना व अन्य उपाययोजना राबविण्याबाबत दिनांक ०६/०९/२०२१ रोजी बैठक संपन्न झाली आहे. या बैठकीत मुख्य अभियंता (नदी-जोड, विशिष्ठ प्रकल्प) हे कार्यालय औरंगाबाद येथे असण्याबाबत चर्चा झाली असून मा.केंद्रीय राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात यावी, असा निर्णय झाला आहे.

गंगापूर व वैजापूर तालुक्यासाठी दारणा धरण समुहात बांधण्यात आलेले (भाम, भावली, वाकी व मुकणे) यांचे नियंत्रण कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. राष्ट्रीय विकास जल अधिकरण केंद्र हे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असल्याने याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील लाखो रुपयांचे साहित्य खाजगी रुग्णालयात पाठविण्यात आल्याबाबत

**(७) १०६२५ (२३-०२-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी अद्ययावत साहित्याच्या माध्यमातून सोयी-सुविधांनी सज्ज करण्यात आले होते परंतु, दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव ओसरल्यानंतर रुग्णालयातील लाखो रुपयांचे साहित्य खाजगी रुग्णालयात पाठविण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औरंगाबाद शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील लाखो रुपयांचे साहित्य खाजगी रुग्णालयात पाठविणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२०-०३-२०२२) :** (१), (२) व (३) कोविड-१९ च्या अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयास साधन सामुग्री प्राप्त झाली होती. (Ventillators, Oxygen concentrator, Bipap Machine इ). जिल्हाधिकारी, औरंगबाद यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार जिल्हा रुग्णालय व त्या अंतर्गत असलेल्या उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयास प्राप्त झालेल्या Ventiallators पैकी काही Ventiallators हे उसणवारी तत्वावर खाजगी रुग्णालयांना कोविड-१९ रुग्णसेवेच्या दृष्टीने जुलै व ऑगस्ट, २०२० मध्ये वितरीत करण्यात आले होते. एकूण ६ खाजगी रुग्णालयांना देण्यात आलेल्या Ventiallators पैकी ५ खाजगी रुग्णालयांनी सदरील Ventiallators सुस्थितीत जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद येथे परत केले आहेत. उर्वरित एक खाजगी रुग्णालय (महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, औरंगाबाद) हे रुग्णालय “डेझिगनेटेड कोविड हॉस्पिटल” असल्याने कोविड-१९ चे एक्टीव्ह रुग्ण उपचार घेत असल्याने सदरील रुग्णालयाने अद्याप व्हेंटीलेटर परत दिलेले नाहीत.

तसेच कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या प्रादुर्भावामध्ये जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयास प्राप्त झालेल्या साहित्यापैकी कोणतेही साहित्य कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव ओसरल्यानंतर खाजगी रुग्णालयास वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील जंजिरा किल्ल्यावर मार्गदर्शिकांच्या गाईडच्या नेमणूका पूर्ववत ठेवण्याबाबत

**(८) १०८२४ (०२-१२-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील जंजिरा किल्ल्याचा इतिहास व परिसराची माहिती पर्यटकांना देण्यासाठी मुरुड जंजिरा पर्यटक संस्थेकडून २० गाईडची नेमणूक करण्यात आली असून सदर गाईडना पुरातन विभागाकडून जंजिरा किल्ल्यामध्ये गाईड म्हणून काम करण्यास मनाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही गड-किल्ल्यांवर गाईड म्हणून काम करण्यासाठी तेथील ग्रामपंचायतीचे ओळखपत्र घेवून गाईडचे काम करण्यास मान्यता दिली असतानाही मुरुड-जंजिरा किल्ल्यावर गाईडचे काम करण्यासाठी संबंधित शासकीय विभागाकडून मान्यता असलेले ओळखपत्र आणण्यास पुरातन विभागाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यटकांना जंजिरा किल्ल्याचा इतिहास व परिसराची माहिती देणाऱ्या गाईडच्या नेमणूका पूर्ववत ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०३-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचे ठिकाणी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्या प्रचलित धोरणानुसार सक्षम प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त केलेल्या मार्गदर्शकांनाच (गाईड) परवानगी आहे.

(३) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई या कार्यालयास स्थानिक मार्गदर्शकांना राष्ट्रीय स्मारक परिसरात पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी परवानगी देण्याबाबत श्री.राजन विचारे, मा.लोकसभा सदस्य यांचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्र भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांच्यामार्फत मार्गदर्शनासाठी महानिदेशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोरोना काळात अनेक ठिकाणी बालकामगार काम करीत असल्याबाबत

**(९) १०९८८ (२३-११-२०२१) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना काळात रोजगार नसलेल्या व आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या अनेक लहान मुलांना कारखाने, वीटभट्टी, डम्पिंग ग्राऊंड व भंगार दुकाने याठिकाणी काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, शाळा सुरु नसल्याने अनेक ठिकाणी लहान मुले काम करताना दिसून येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या बालकामगारांची सुटका व पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२२) :** (१) कोरोना काळात संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू करण्यात आली होती. यावेळी संचारबंदीमध्ये केवळ अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने सुरु होते. तसेच अत्यावश्यक सेवेत काम करीत असलेल्या कामगारांना ओळखपत्र सादर करुन कामावर हजर राहावे लागत होते. अशा परिस्थितीत बाल कामगार काम करीत

असल्याची तक्रार कामगार विभागाकडे प्राप्त झालेली नाही. त्यामुळे लहान मुलांना नाईलाजास्तव कारखाने, विटभट्टी, डम्पिंग ग्राऊंड, भंगार दुकाने यासारख्या ठिकाणी काम करावे लागत होते, ही बाब खरी नाही.

तथापि, पुणे येथील एका स्वयंसेवी संस्थेने दिनांक १० जून, २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय बालमजुरी दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या एका ऑनलाईन चर्चासत्रात दोन मुलींनी त्यांचे पालक कचरा वेचण्याचे काम करीत असल्याचे, पण कोरोनामुळे शाळा बंद असल्याने त्यांना पालकांसमवेत कचरा वेचण्यास जावे लागत असल्याची व त्यांना शाळेत शिकण्याची भावना व्यक्त केली होती.

तथापि, त्यानुषंगाने कोणतीही तक्रार कामगार आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) कोरोना कालावधीत शाळा बंद असल्याने पुणे शहरामध्ये कचरा गोळा करणाऱ्या कामगारांच्या दोन मुली पालकांसमवेत कामास गेली असल्याची बाब निदर्शनास आली आहे. याव्यतिरिक्त, अन्य कोणत्याही उद्योगामध्ये लहान मुलांना पालकांच्या जागी कामावर जावे लागत असल्याची बाब अथवा तक्रार कामगार विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

कामगार आयुक्त कार्यालयाने कारखाने, विटभट्टी, डम्पिंग ग्राऊंड, भंगार दुकाने यासारख्या ठिकाणी एप्रिल, २०२० ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत आयोजित केलेल्या १५० धाडसत्रांमध्ये उपरोक्त ठिकाणी बाल कामगार कामावर जात असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात साथीच्या आजारावर नियंत्रण आणण्याबाबत

**(१०) ११००८ (२३-११-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.विनायकराव मेटे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्हयांमध्ये विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात महापुरानंतर साथीच्या विविध आजारांचा मोठ्या प्रमाणात फैलाव झाला असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शहरी व ग्रामीण भागात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया सदृश्य आजारांचे रुग्ण आढळून आले असून वर्धा जिल्हयामध्ये डेंग्यूचे ३१३ रुग्ण व मुंबईत माहे जून, २०२१ अखेरीस मलेरियाचे २७१, गॅस्ट्रोचे १४९ व डेंग्युचे १९ रुग्ण आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनामुक्त झालेल्या किंवा मधुमेह व उच्च रक्तदाब इत्यादी दीर्घकालीन आजार असलेल्या रुग्णांमध्ये प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे चिकनगुनियाची लक्षणे तीव्र प्रमाणात आढळत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायत स्तरावर डेंग्यू व चिकनगुनिया रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासन आराखडा तयार करणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने साथीच्या आजारांवर नियंत्रण आणण्याबाबत तसेच रुग्णांना उपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-०३-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये पूरपरिस्थितीमुळे कोल्हापूर मध्ये डेंग्यू रुग्ण संख्येत तुरळक स्वरुपात वाढ झाल्याचे दिसून येते तर सिंधुदुर्ग व अमरावती येथे हिवताप रुग्णसंख्येत किरकोळ वाढ दिसून येते, बाकी इतर आजारांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर रुग्णांची माहिती खालीलप्रमाणे :-

| | हिवताप | | डेंग्यू | | चिकनगुनिया | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत | लागण | मृत | लागण | मृत |
| ग्रामीण | ७४०८ | १२ | ५०८६ | १७ | ९४१ | ० |
| शहरी | ४६७८ | ० | ५२३४ | ५ | ११४० | ० |

तर वर्धा येथे माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर डेंग्यूचे ४०६ रुग्ण आढळून आले आहेत तर २ मृत्यू आहेत. तर मुंबईमध्ये जून, २०२१ मध्ये मलेरिया ३५७, गॅस्ट्रोचे १८० व डेंग्यूचे १२ रुग्ण आढळून आलेले आहेत तर एकही मृत्यू झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

असे निरीक्षण कुठेही आढळलेले नाही.

(४) राज्यातील सर्व सरकारी दवाखान्यांमध्ये या आजारासाठी लक्षणांवर आधारीत उपचार उपलब्ध आहेत तसेच या आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना उपलब्ध आहेत.

(५) साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

- साथरोगाचे दैनंदिन सर्वेक्षण.
- कीटकजन्य आजारासाठी कीटक शास्त्रीय सर्वेक्षण व एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- उपराचारासाठी आवश्यक औषधांची पुरेशी उपलब्धता.
- सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये उपचारांची सुविधा, निदानासाठी प्रयोगशाळा सुविधा.
- पाणी गुणवत्ता नियंत्रण.
- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची स्थापना.
- डासोत्पत्ती रोखण्यासाठी लोकसहभाग.
- साथरोग संदर्भात जनतेचे आरोग्य शिक्षण

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यात बांधलेले सहा मध्यम व लघु जलप्रकल्पांपैकी पाच प्रकल्पांना गळती लागल्याबाबत

**(११) १११९५ (२३-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेले सहा मध्यम व लघु जलप्रकल्पांपैकी पाच प्रकल्पांना गळती लागल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४० वर्षाचा कालावधी होऊनही गळती व कालव्यांच्या अर्धवट कामांमुळे धरणांचा मूळ उद्देश साध्य झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणांमुळे तालुक्यातील १३४६ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली येण्याची अपेक्षा होती परंतु एक हेक्टरही जमीन ओलिताखाली आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जलप्रकल्पांची गळती थांबवून कालव्यांचे काम करून तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०९-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

कोकण प्रदेशांतर्गत मंडणगड तालुक्यामध्ये मध्यम प्रकल्प नसून भोळवली, पणदेरी व तिडे हे तीन ल.पा.प्रकल्प आहेत. त्यापैकी पणदेरी ल.पा. योजनेंतर्गत धरणाचा सा.क्र.०/५५ मी. येथील मुख्य विमोचका नजिकचा भराव माहे जुलै, २०२१ मध्ये खचल्याने गळती सुरू झाल्याचे निदर्शनास आले आहे. भोळवली प्रकल्पात देखील काही प्रमाणात गळती होत असून त्यावर गळती प्रतिबंधात्मक उपाययोजनेची कामे प्रगतीपथावर आहे. तिडे प्रकल्पात सद्य:स्थितीत गळती नाही.

(२) नाही.

(३) पणदेरी, भोळवली व तिडे या धरणांद्वारे निर्माण होणाऱ्या १८४८ हे. सिंचन क्षमतेपैकी जून २०२१ अखेर १३०४ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तथापि, सिंचनासाठी पाण्याची मागणी नसल्याने जमीन ओलिताखाली आली नाही.

(४) भोळवली व पणदेरी प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. भोळवली प्रकल्पांतर्गत धरण गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

पणदेरी धरणास झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने तातडीच्या उपाययोजना करून गळती थांबविण्यात आली आहे. तसेच पणदेरी धरण दुरूस्तीच्या अनुषंगाने विशेष दुरूस्ती अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीपथावर आहे. पणदेरी प्रकल्पाच्या कालवा पुनर्स्थापना कामाचा समावेश सन २०२१-२२ च्या विशेष दुरूस्ती आणि विस्तार कृती आराखड्यामध्ये करण्यात आलेला आहे.

तिडे प्रकल्पांतर्गत बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे कालव्याची कामे प्रगतीपथावर असून जून २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील केशोरीतील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१२) ११२७६ (२३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून इमारतीची पडझड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसुतिगृहे, शल्यचिकित्सक कक्ष व ओपीडी कक्ष जीर्ण झाली असून आरोग्य केंद्रात भौतिक सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतीची देखभाल, दुरुस्ती व नुतनीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१३-०३-२०२२) :** (१) आणि (२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था झाली असून पडझड झालेली नाही. तसेच प्रसुतीगृह, शल्यचिकित्सक कक्ष व ओपीडी कक्ष येथे सद्य:स्थितीत दुरुस्ती आवश्यक आहे तथापि, तेथे नियमित कामकाज सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मुख्य इमारतीची दुरुस्ती, पाईपलाईन, विद्युतीकरण ह्या दुरुस्तीना मंजूरी मिळाली असून काम प्रगतीपथावर आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये प्रसुतीगृह दुरुस्तीच्या कामाला मंजूरी देण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत व निवासस्थान निर्लेखित करुन पुर्नबांधणी करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वाजनिक बांधकाम विभाग यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातगाव (डोंगरी) (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील ग्रामसेवक, विस्तार अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांनी लाखो रुपयांच्या निधीचा अपहार केला असल्याबाबत

**(१३) ११३०५ (२३-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातगाव (डोंगरी) (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील ग्रामसेवक, विस्तार अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांनी संगनमताने लाखो रुपयांच्या निधीचा अपहार केला असून याबाबत चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर

कारवाई करून अपहाराची रक्कम वसूल करावी अशी मागणी सातगाव डोंगरी येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगाव यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) होय, या प्रकरणी गट स्तरावर चौकशी प्रस्तावित केली असून चौकशीमध्ये वित्त आयोगाच्या निधीच्या झालेल्या कामामध्ये प्रथम दर्शनी कमी मूल्यांकन आढळून आलेले आहेत. सदर कामांचा राज्य गुणवत्ता निरीक्षक कडील तांत्रिक गुणवत्ता तपासणी अहवाल येणे बाकी असल्याने चौकशी अहवाल अंतिम करता आलेला नाही. चौकशी अहवाल अंतिम झाल्यावर दोषींवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कोडोली (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच यांनी ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१४) ११३७१ (२३-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ६११६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोडोली (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व अन्य दोन सदस्यांना ग्रामपंचायतीमधील आर्थिक गैरव्यवहार व अन्य प्रकरणी दोषी ठरवून विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशानुसार आदेशाच्या दिनांकापासून पुढील ६ वर्षे निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविल्याचे आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच श्रीमती निता खंडागळे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(३) नुसार ग्रामविकास मंत्र्याकडे अपील दाखल केले असता सदर अपिलावर मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशास स्थगिती देऊन आर्थिक व धोरणात्मक निर्णय बैठकीमध्ये घेऊ नये असा सुधारित आदेश देण्यात आला होता, परंतु सदरचा आदेशही रद्द करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोडोली येथील सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ३९(३) नुसार दाखल केलेल्या अपिलावर १ महिन्यात निर्णय घेणे बंधनकारक असताना १ वर्ष झाले तरी निर्णय घेण्यात आला नसल्यामुळे वेळीच निर्णय देण्यात न आल्याने सदर सदस्यांनी नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीचे उमेदवार म्हणून पुन्हा निवडणूक लढविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(३) नुसार दाखल झालेल्या अपिलावर १ महिन्यात निर्णय न होण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रलंबित अपील प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०७-०३-२०२२) :** (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे अंशतः खरे आहे.

(४) सदर प्रकरण हे अर्ध-न्यायिक (Quasi-Judicial) प्रकरण असून मा.मंत्री महोदयांना या बाबत सुनावणी घेण्याचे आणि निर्णय पारित करण्याचे अधिकार आहेत.

(५) मा.मंत्री (ग्रामविकास) महाराष्ट्र राज्य यांचे न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३९(३) नुसार दाखल अपिलावरील आदेश दिनांक ०६/०४/२०२१ रोजी पारित झाले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत अंगापूर वंदन (ता.जि.सातारा) अंतर्गत करण्यात आलेल्या कामकाजाच्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(१५) ११३७४ (२३-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगापूर वंदन (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीने सन २०२०-२१ मध्ये विकास कामे करतांना ठराविक ठेकेदारांना फायदा व्हावा या हेतूने सदोष निविदा प्रक्रिया राबविल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित उप अभियंत्यांनी कामाची मोजमापे न नोंदविताच स्वाक्षरी केल्याचे तसेच कामाच्या अंदाजपत्रकात अंतर्भुत असलेल्या साहित्याच्या गुणवत्ता चाचण्या घेण्यात न आल्याचे व कामावरील साहित्याची रॉयल्टी (स्वामीत्वधन) देखील भरण्यात आली नसून जी.एस.टी पावत्याही देण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंग्लाई देवी मंदिराशेजारी संरक्षक भिंत बांधणे हे काम पुन्हा दुसऱ्या नावाने सुरु करणे तसेच बाजार पटांगण गणेश मंदिर येथे पाणी टाकी बांधणे या कामाचे अंदाजपत्रक नसतानाही रुपये १ कोटी ९३ हजार ठेकेदारास अदा केल्याचे त्याचप्रमाणे कोणत्याही कामांची मोजमापे न नोंदविता अनेक कामे झाल्याचे दाखवून शासन निधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांविरुध्द व निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय व मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदने सादर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांविरुध्द व निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

तक्रारदार श्री.प्रविण अंकुश कणसे यांच्या दिनांक ३१/१/२०२० च्या तक्रार अर्जास अनुसरुन गटविकास अधिकारी, वाई यांनी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे.सदर अहवालानुसार, अंगापूर वंदन ग्रामपंचायतीमध्ये १४ वा वित्त आयोग निधी मधून विविध कामे करताना ग्रामपंचायतीने जाणिवपूर्वक ई-निविदा करणे बाबत टाळाटाळ करणे, काम नोंदणीकृत ठेकेदारास न देता स्थानिक ठेकेदारास देणे, कामांची अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता नसताना केवळ मोजमाप पुस्तकाच्या आधारे कामाचे देयक अदा करणे इ. प्रशासकीय व आर्थिक अनियमितता केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंगलाई देवी मंदिरा शेजारी संरक्षण भिंत बांधणे रक्कम खर्च रुपये २२२०००/- इतका असून त्याचे मुल्यांकन रक्कम रुपये २२२८७८/- इतके आहे. सदर संरक्षण भिंत बांधणे या कामास तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात बाजार पटांगण गणेश मंदिर येथे पाणी टाकी बांधणेवर खर्च रक्कम रुपये १९२९५३/-असून मुल्यांकन रक्कम रुपये १९२९५३/- इतके आहे. सदर टाकी बांधकामासाठी अंदाजपत्रक न करता रक्कम रुपये १९२९५३/- ठेकेदारास अदा केलेले आहेत. मात्र, सदर कामास तांत्रिक मान्यता देणेत आले नसल्याचे व काम पूर्णत्वाचा दाखला (न.नं.६५) देण्यात आला नसल्याचे दिसून येत आहे. सदर कामे शासनाचे विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता केली असल्याचे दिसून येते.

(४) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी तक्रारदार श्री.प्रविण अंकुश कणसे यांनी दिनांक ३१/०१/२०२० रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे निवेदन दिलेले होते. सदरचे निवेदन विभागीय आयुक्त कार्यालयाकडून सातारा जिल्हा परिषदेस दिनांक १४/०२/२०२० रोजीचे पत्रासोबत प्राप्त झाले आहे.

(५) सदर प्रकरणी संबंधित तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द जिल्हा परिषद,सातारा कार्यालयाकडील क्रं.साप्रवि २ ग्रापं.३/११०५/२१ दिनांक २७/०५/२०२१ अन्वये, विभागीय स्तरावर खातेनिहाय चौकशी चालू आहे.

तसेच संबंधित तत्कालीन सरपंच यांचा कालावधी दिनांक ०९/११/२०२० रोजी संपलेला असून, सध्या ते कार्यरत नाहीत. सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडून खातेनिहाय चौकशीचे निष्कर्ष प्राप्त झालेनंतर संबंधित ग्रामविकास अधिकारी व पदाधिकारी यांचेवर कारवाई प्रस्तावित करणेत येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कावसा (जि.अकोला) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सोई-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१६) ११४२४ (२५-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कावसा (जि.अकोला) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहत असून तेथील अनियमितता व सोई-सुविधांचा अभाव याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी जिल्हा परिषद, अकोला आरोग्य विभागाकडे तक्रारी देऊनही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहत असल्याने व सोई-सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना आरोग्य सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील अनेक आरोग्य केंद्रांना आरोग्य विभागाच्या भरारी पथकाने भेटी दिल्या असता तेथील अनियमितता व कर्मचाऱ्यांची गैरहजेरी दिसून आली असून जिल्ह्यातील किती आरोग्य केंद्रांना भरारी पथकाने भेटी दिल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कावसा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गैरहजर राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत व सोई-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१२-०३-२०२२) :** (१) आणि (२) हे अंशतः खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सर्व आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अकोला यांचे आदेशानुसार गठीत केलेल्या भरारी पथकाने दिनांक १९/०१/२०२१ रोजी आठ प्राथमिक आरोग्य केंद्राना आकस्मित भेटी दिल्या. सदर भेटी दरम्यान गैरहजर अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत.
(४) भरारी पथकाने दिनांक १९/०१/२०२१ रोजी कावसा प्राथमिक आरोग्य केंद्राला दिलेल्या भेटी दरम्यान गैरहजर १ वैद्यकीय अधिकारी, ३ आरोग्य कर्मचारी व १ परिचर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्या दिनांक ०४/०२/२०२१ च्या आदेशानुसार १ वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे व १ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीचा टीडीएस भरण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) ११४५९ (२५-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींचा टीडीएस भरण्याच्या कामाचा रुपये १५०० कोटींचा ठेका ग्रामविकास विभागाने दिनांक १० मार्च, २०२१ रोजी कोल्हापूर

जिल्ह्यातील जयोस्तुते मॅनेजमेंट कंपनीला १० वर्षासाठी नियमाचे पालन न करता दिला असून सदरहू ठेका देताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची तक्रार शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जयोस्तुते कंपनीला ठेका दिल्यानंतर ग्रामविकास विभागाने दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये तो रद्द केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, सदरहू ठेका देताना शासनाने कोणते निकष लावले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२२) :** (१), (२) व (३) • अंशत: खरे आहे.

- ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२४२०/प्र.क्र.१९/आपले सरकार कक्ष, दिनांक १० मार्च, २०२१ अन्वये राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमध्ये तसेच ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील इतर कार्यालयांमध्ये GST TDS, Income Tax वरील TDS/TCS तसेच Labour Cess, रॉयल्टी व इंश्युरन्स इ. प्रकारच्या वजावटी यांचा भरणा करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून मे.जयोस्तुते मॅनेजमेंट प्रा.लि. या संस्थेची निवड करण्यात आली होती.
- ग्रामविकास विभाग शासन शुध्दीपत्रक दिनांक २९ जुलै, २०२१ अन्वये ग्रामपंचायत व्यतिरिक्त इतर कार्यालयांमध्ये निवड केलेल्या संस्थेकडून काम करून घेणे ऐच्छिक करण्यात आले तसेच शासन निर्णय दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ अन्वये ग्रामपंचायतींना देखील सदर संस्थेकडून काम करून घेणे ऐच्छिक करण्यात आले.
- ग्रामपंचायतींकडून सदर संस्थेकडून काम करून घेण्यास प्रतिसाद मिळत नसल्याने शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ अन्वये मे.जयोस्तुते मॅनेजमेंट प्रा.लि. या संस्थेची निविदा प्रक्रियेद्वारे केलेली निवड रद्द करण्यात आली असून दिनांक १० मार्च,२०२१ व त्यानुषंगाने निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

- दरम्यान यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येते, ही बाब तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत सीआरटी (कालेलकर) आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्तीवेतन मिळणेबाबत

**(१८) ११६०८ (०३-१२-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सीआरटी (कालेलकर) आस्थापनेवरील कर्मचारी यांना दिनांक ६ जानेवारी, १९९८ रोजी आदेश देऊन रुपांतरीत नियमित आस्थापनेवर अनुमती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ६९ कर्मचाऱ्यांपैकी ३५ कर्मचारी कार्यरत असून ३४ सेवानिवृत्त कर्मचारी आहेत या सर्व कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व निवृत्त वेतन माहे मार्च, २०२१ पासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापैकी २१ कर्मचाऱ्यांची जिल्हा परिषदेने नेमणूक केली असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना या जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झाल्याने ४८ कर्मचारी हे जिल्हा परिषदेकडे वर्ग झालेले आहेत परंतु या पदांना शासनाची मान्यता नसल्याने सदर कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्तीवेतन देय नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, रत्नागिरी यांनी या ६९ कर्मचारी यांचा वेतन व निवृत्तीवेतन मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ४ जून, २०२१ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ६९ पदांना मंजूरी देऊन त्यांना वेतन व निवृत्तीवेतन देण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी विधानपरिषद विरोधी पक्ष नेता यांनी त्यांच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्राव्दारे शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व ६९ पदांना मंजूरी देण्याबाबत तसेच, कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व निवृत्तीवेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर पत्र ग्रामविकास विभागात प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(६) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## ग्रुप ग्रामपंचायत तळवली तर्फे आष्टमी (ता.रोहा, जि.रायगड) या ग्रामपंचायतीतील सरपंच व ग्रामसेवकानी गैरव्यवहार केल्याबाबत

**(१९) ११६५२ (२३-११-२०२१) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रुप ग्रामपंचायत तळवली तर्फे आष्टमी (ता.रोहा, जि.रायगड) या ग्रामपंचायतीस तेथील “अन्त्या प्रायव्हेट लिमिटेड” कंपनीकडून शाळा बांधकामासाठी रुपये ५ लाख देण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी सदर निधीचा योग्यप्रकारे विनियोग न करता व ग्रामपंचायत प्रोसिडिंगला मान्यता न घेताच सदरची रक्कम बँक खात्यातून परस्पररित्या काढून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करुन संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांचेकडून रक्कम व्याजासहीत वसूल करावी अशी मागणी ग्रामपंचायतीचे उपसरपंच व अन्य ग्रामपंचायत सदस्यांनी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती रोहा यांचे चौकशी अहवालनुसार, सदर ग्रामपंचायतने शाळा वर्ग खोली बांधकाम करण्याकरीता कोणतीही निविदा प्रक्रिया न करता मासिक सभेत मोघम ठरवान्वये ठेकेदार यांची निवड केली असून आगाऊ रक्कम अदा करण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) संबंधित सरपंच यांचे विरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३९(१) नुसार पुढील कार्यवाही करणेसाठी अहवाल विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सादर करण्यात आलेला आहे. तसेच, संबंधित ग्रामसेवक यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई जिल्हा परिषद, रायगड कार्यालयाकडून प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे वाटूळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे सुपर मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत

**(२०) ११६६० (१५-१२-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४६२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाटूळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे सुपर मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची ५ एकर जागा महसूल आणि वन विभागास हस्तांतरीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय हे उपचाराच्या आधुनिक सोई-सुविधांनी सुसज्ज असल्याने रत्नागिरी जिल्ह्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या कामाची सुरुवात झाली आहे काय व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-०३-२०२२) :** (१), (२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १७/०९/२०२१ च्या ज्ञापनान्वये, मौजे वाटूळ (ओणी) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जागेपैकी ५ एकर जागा (२.०२ हेक्टर) सुपर मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करणेसाठी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करणेसाठी मान्यता दिलेली आहे. सदरची जागा सद्य:स्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नावे झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.